## निवडक

### डिचोलीत जलवाहिनी फुटल्याने पाणी पूरवठ्यावर परिणाम

■ टीम दैनिक हेराल्ड



**डिचोली, दि. २०** : डिचोली येथे जलवाहिनी फुटलाने डिचोली शहर मुस्लिमवाडा औद्योगिक वसाहत पाचवाडा, लामगाव आदी परिसरात दोन दिवस पाणी पुरवठ्यावर परिणाम झाला असून लोकांची बरीच गैरसोय झाली.

डिचोली येथे गाळ उपासण्याचे काम सुरू असताना जलवाहिनी तुटल्याने पाणी पुरवठ्यार परिणाम झाला. त्यामुळे शहरात पाणी पुरवठा खंडित होऊन लोकांची बरीच गैरसोय झाली. बाजारात हॉटेल तसेच लोकांनाही त्रास झाला. दुरुस्ती काम सोमवारी रात्री पर्यंत सुरू होते. भरती मूळ पाणी भरल्याने दुरुस्ती कामात अडथळे निर्माण होत असल्याचे सांगण्यात आले. दुरुस्ती काम सुरू असल्याच सगण्यात आले.

---

### आंबेगाव पाळी येथे घराला आग; लाखोंचे नुकसान



■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. २०** : आंबेगाव पाळी येथे मंगळवारी सकाळी लागलेल्या आगीत महादेव दळवी यांच्या घरांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाजाने व्यक्त केला आहे. या आगीत घराचे संपूर्ण छप्पर घरातील वस्तू जळून खाक झाल्याने दळवी कुटुंबावर मोठे आपत्ती कोसळली आहे. अग्निशामक दलाचे अधिकारी राहुल देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली टीम दाखल झाले. स्थानिक व इतरांच्या सहकार्याने आग आटो क्यात आणली. काही लाखांची मालमत्ता वाचवण्यात यश आले. तर सुमारे तीन लाखाहून अधिक नुकसान झालेअशी माहिती अग्नीशमक दलातर्फे देण्यात आली. स्थानिक सरपंच संतोष नाईक पंच तलाठी मार्फत आढावा घेण्यात आला असून पंचनामा करण्यात आला आहे. या प्रकरणी अधिक तपास जारी आहे.

---

### नानूटेल फिडरवर उद्या खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २०** : ११ केव्ही नानूटेल फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने गुरुवार दि. २२ रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत बांबिनो स्कूल, चायनिज नेस्ट आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

त्याचप्रमाणे टेक्सेरा फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने शुक्रवार दि. २३ रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत शिरवडे आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

### सांगे तालुक्यात वीज तारांबाबत इशारा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २०** : सांगे तालुक्यातील ३३ केव्ही शेल्डे केपे फिडरसाठी दाबामळ जंक्शन ते ३३ केव्ही पंटेमळ उपकेंद्रापर्यंत नव्याने उभारण्यात ३३ केव्ही भूमिगत वीज वाहिन्या व त्याच्या संघटित ११ केव्ही भूमिगत वीज यंत्रणा २५ मेंपासून विद्युत भारीत करण्यात आली असून या पुढेही ती तशीच भारीत राहील. लोकांनी या वरील यंत्रसामुग्रीपासून दूर रहावे त्यांना स्पर्श करू नये अन्यथा जिवीतास धोका आहे.

---

### पणजीत २४ रोजी महिला साहित्यिक मेळावा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २०** : मिनेझिस ब्रागांझा संस्थेने शनिवार दि. २४ रोजी प्रेयल फार्म हाऊस, खांडेपार, फोंडा येथे बहुभाषिक महिला साहित्यिक मेळावा आयोजित केला आहे. राज्यात साहित्य आणि कला संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी संस्थेच्यावतीने दरवर्षी कार्यशाळा, परिसंवाद, स्पर्धा यासारखे कार्यक्रम आयोजित करण्यात येतात.

समाज सेविका श्रीमती सुलक्षणा सावंत यांच्याहस्ते इतर मान्यवरांच्या उपस्थितीत सकाळी १० वाजता या कार्यक्रमाचे उद्‌घाटन होणार आहे. साहित्य क्षेत्रात योगदान दिलेल्या महिला या मेळाव्यात भाग घेतील. मेळाव्यात कविता लेखन, साहित्य लेखनावर चर्चा आणि मार्गदर्शन सत्रे होतील. समारोप समारोप समारंभ संध्याकाळी ४.३० वाजता होणार आहे. गोव्यातील महिला लेखिकांनी या बहुभाषिक महिला साहित्यिक मेळाव्यात सहभागी होण्याची विनंती संस्थेने केली आहे.

# काणकोण रवींद्र भवनला पहिल्याच पावसात गळती


### संपूर्ण चौकशी व्हावी : सर्वत्र पाणीच पाणी | गळतीमुळे तियात्रचा प्रयोग करावा लागला बंद

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. २०** : साधारणपणे नऊ महिन्यांपूर्वी उद्‌घाटन केलेल्या काणकोण रवींद्र भवनच्या छप्पराखालून आज २० रोजी, सकाळी ११ च्या दरम्यान झालेल्या पावसामुळे पाणी येऊ लागल्यामुळे त्याठिकाणी उपस्थितांची तारांबळ उडाली. पहिल्या मजल्यावरील कला व संस्कृती खात्याच्या वाचनालयाच्या छतावरून पाणी आल्याने वाचनालयातील पुस्तके व ईतर साहित्य पार भिजले. या ठिकाणी तिकीट विक्री करून सादर केला जाणार कोकणी तियात्र आयोजकांना खबरदारीचा उपाय म्हणून बंद करावा लागला.

काणकोण रवींद्र भवनच्या छतावरून पाणी यायला लागले व सर्वांची तारांबळ उडाली. उपस्थित स्वच्छता कर्मचाऱ्यांनी साचलेले पावसाचे पाणी बाहेर फेकले, मात्र लोट येतच राहिला. काणकोण पत्रकारांनी कदाचित वीजेचा शॉर्ट सर्कीटचा संभाव्य धोका ओळखून काणकोण वीज कार्यालय व अग्निशमन दलाच्या जवानांना सुचीत केले.





काणकोण : नवीन रवींद्र भवनच्या वाचनालयातील व अन्य काही पहिल्या पावसातील दृष्ये.

रवींद्र भवनचे काम पूर्ण होण्यापूर्वीच घाईगडबडीत या प्रकल्पाचे उद्‌घाटन केले. त्यामुळे आजची परिस्थिती उद्भवली असल्याची प्रतिक्रिया उपस्थित नगरसेवक शुभम कोमरपंत यांनी व्यक्त केली.

ह्या प्रकल्पाकरिता सरकारने कोट्यवधी रुपये खर्च केले. ते सर्व करदात्यांचे होते. ते सर्व वाया गेले. यांची सुपारी कोणाला दिली होती? हे संबंधितानी स्पष्ट करायला हवे. याची निष्पक्षपणे चौकशी करावी. असे गोवा फोर्वर्ड पक्षाचे नेते विकास भगत यांनी सांगितले.

याठिकाणी छप्परातून पाणी सर्वत्र पाणीच पाणी प्यायला मिळणे हे संपूर्ण बांधकाम ठेकेदार यांचे अपयश आहे. या ठेकेदाराची सखोल चौकशी करून त्याने ठेवलेली अनामत रक्कम गोठवावी. अशी मागणी स्थानिक नगरसेवक रमाकांत नाईक गावकर यांनी केली आहे.

दरम्यान कला व संस्कृती मंत्री गोविंद गावडे हे उद्घाटनापुर्वी काही दिवस अगोदर रवींद्र भवन प्रकल्पाची पाहणी करण्यासाठी आले असता दैवसुयोगाने वाचनालयाच्या भिंतीवरून पाहणी झिरपत असल्याचे पत्रकारांनी मंत्री गावडे यांना दाखवले होते. व मंत्री गावडे यांनी संबंधित ठेकेदाराला ते गांभीर्याने घेऊन काम करायलासुद्धा सांगितले होते,असे एका प्रत्यक्षदर्शी पत्रकारांने सांगितले होते,

# पावसाळी होड्या ठेवण्यासाठी जमीन देण्याची मच्छीमारांची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २०** : बाणावली येथील पारंपरिक मच्छीमार समुदायाने आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर बंद पडलेल्या कोळंबी हॅचरीतील एक भाग सरकारकडून त्यांच्या ताब्यात देण्याची मागणी पुन्हा एकदा जोरात मांडली आहे. या जमिनीचा उपयोग त्यांनी मासेमारीच्या देशी बोटी ठेवण्यासाठी आणि जाळी साठवण्यासाठी करावा, अशी विनंती आहे.

मच्छिमारांचे म्हणणे आहे की, मत्स्यव्यवसाय विभागाच्या अखत्यारीत असलेल्या सुमारे ५२,हजार चौरस मीटर क्षेत्रफळामधून केवळ ५, हजार चौरस मीटर इतकीच मर्यादित जमीन हक्काने मिळावी, ही त्यांची अत्यावश्यक गरज आहे. आमच्या बोटीसाठी किनाऱ्यावर जागा उरलेली नाही. समुद्रपातळी वाढल्यामुळे तेथील पर्याय धोकादायक ठरू लागले आहेत. शिवाय खाजगी मालकांनी त्यांच्या मालमत्तांवर बोटी ठेवण्यास विरोध केला आहे. त्यामुळे आमच्याकडे आता दुसरा पर्याय उरलेला नाही, असे स्थानिक मच्छीमार पेले फर्नांडिस यांनी स्पष्ट केले.

फर्नांडिस यांनी सांगितले की, बाणावलीमध्ये सध्या सुमारे ८१ पारंपरिक मच्छीमार बोटी आहेत. मात्र त्यांना साठवण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नाही. कोळंबी हॅचरी गेल्या कित्येक वर्षांपासून इथे आहे आणि ही जमीन आमच्या समुदायाशी पिढ्यानपिढ्या जोडलेली आहे. सरकारने ती हक्काची जमीन म्हणून मच्छिमारांसाठी राखून ठेवावी, अशी त्यांची ठाम मागणी आहे.

दरम्यान, मत्स्यव्यवसाय विभागाने हॅचरी प्रकल्पाचे पुनरुज्जीवन सार्वजनिक–खाजगी भागीदारी (पीपीपी) पद्धतीने करण्याचा प्रस्ताव दिला आहे. मात्र या प्रस्तावाला स्थानिक मच्छीमारांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. खाजगी गुंतवणूकदारांना प्राधान्य दिले जात असून स्थानिकांच्या गरजा दुर्लक्षित केल्या जात आहेत, हे दुर्दैवी आहे,अशी टीका फर्नांडिस यांनी केली.

मच्छिमारांनी सरकारला स्पष्ट इशारा दिला आहे की, त्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष करून पीपीपी योजनेच्या अंमलबजावणीकडे वाटचाल झाली, तर ते आंदोलनात्मक भूमिका घेतील. आमची मागणी केवळ ५ हजार चौरस मीटरवर मर्यादित असून ती एकूण क्षेत्रफळाच्या केवळ १०७ इतकी आहे. ती आम्हाला उपजीविकेसाठी आवश्यक आहे, असे त्यांनी अधोरेखित केले.

या पार्श्वभूमीवर मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिकाऱ्यांनी लवकरच संयुक्त तपासणी करून योग्य निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे स्थानिक मच्छीमारांना सरकारकडून सकारात्मक प्रतिसादाची अपेक्षा आहे.

# मोरजी रस्त्यावर पाणीच पाणी...

■ टीम दैनिक हेराल्ड

▸ गटार व्यवस्था कोलमडल्यामुळे रस्त्यावर पाणी

▸ त्वरित उपाययोजना करण्याची मागणी

**पेडणे, दि. २०** : मान्सून पूर्व कामांना सरकारने मोरजी पंचायत क्षेत्रातून सुरुवात न केल्यामुळे अनेक परिसरात रस्त्यावर पाणी साचल्यामुळे तलाव झाल्याचे चित्र दिसून येते. सरकारने मान्सूनपूर्व कामे लवकरात लवकर हाती घ्यावी, अशी मागणी गेल्या महिन्यातच ग्रामस्थांनी केली होती. आणि मोरजी पंचायत क्षेत्रातील जी गटार व्यवस्था तुडुंब भरलेली आहे. ती उपसून त्यावर उपाययोजना करावी, अशी मागणी केली. परंतु सरकारने या गोष्टीकडे दुर्लक्ष केल्यामुळे जनजीवन विस्कळीतही झाले आहे. पूर्ण दिवस पाऊस पडत असल्यामुळे रस्त्यावर पाणीच पाणी होण्याचा प्रकार घडला.

मोरर्जी पंचायत क्षेत्रातील खिंड जंक्शन बागवाडा येथील सी हॉर्स रिसॉर्टच्या जंक्शनवर विद्याप्रसारक हायस्कूल जंक्शन मरडी वाडा ते मुनांग वाडा रस्ता नारोजीवाडा रस्ता अशा ठिकठिकाणी परिसरात मोठ्या प्रमाणात रस्त्यावरच पाणी साचल्यामुळे वाहन चालकांना पाण्याचा अंदाज येत नसल्यामुळे वाहन चालकांना कसरत करावी लागते. दोन्ही बाजूने दुकाने घरे असल्यामुळे हे पाणी तुडुंब भरले आहे. पावसाचा जर जोर असाच सुरू राहिला तर रस्त्यावरील थेट पाणी घरात दुकानांमध्ये शिरण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली.



सार्वजनिक बांधकाम खाते सध्या ज्या ठिकाणी रस्ता रुंदीकरण करण्यास जागा मिळते. त्या ठिकाणी रस्ता रुंद करते. परंतु जी गटार व्यवस्था होती, त्या गटारांचे काय झाले? पावसात रस्त्यावरील पाणी जाणार कुठे? याचा अभ्यास सार्वजनिक बांधकाम खात्याचे अभियंते करत नाही का? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

मोरजी पंचायत क्षेत्रात जे पारंपारिक ओव्हळ नाले आहेत, ते जलसिंचन खात्या अंतर्गत पावसापूर्वी उपसावेत अशी मागणी पंचायत मंडळांनी संबंधित खात्याकडे केली. परंतु जलसिंचन खात्याने मान्सूनपूर्व कामे हाती न घेतल्यामुळे नागरिक नाराजी व्यक्त करतात.

# पहिल्याच पावसात नागरिकांचे जनजीवन विस्कळीत

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २०** : मंगळवारी पडलेल्या मान्सूनपूर्व पहिल्याच जोरदार पावसाने मडगाव शहरासह सासष्टी तालुक्यातील अनेक भाग जलमय झाले. खराब ड्रेनेज व्यवस्था आणि अनियोजित नागरी पायाभूत सुविधा यामुळे प्रमुख रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहतूक कोंडी निर्माण झाली. परिणामी, नागरिक आणि प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला.

मडगावमधील ओल्ड स्टेशन रोड, पाजीफोंड, कोलमोरोड आणि इतर व्यावसायिक भाग पाण्याखाली गेले. आर्लेम महामार्गावर देखील पाणी साचल्यामुळे तो जवळपास दुर्गम झाला होता. कार्यालयीन वेळेत ही परिस्थिती ओढवल्याने वाहनचालक आणि पादचाऱ्यांची मोठी गैरसोय झाली. पावसाचा जोर फारसा नसतानाही जलनिकासी व्यवस्थेतील त्रुटी पुन्हा एकदा



स्पष्टपणे समोर आल्या. गटारे तुंबल्यामुळे अनेक वाहनं रस्त्यावरच अडकून पडली. पादचारी, विशेषतः वृद्ध नागरिक, गढूळ पाण्यातून वाट काढत असताना दिसले.

जुने मार्केट परिसर आणि बोर्ड परिसरातील सखल भागांतील काही दुकांनांमध्ये पाणी शिरल्याने किरकोळ नुकसान झाल्याची नोंद आहे. त्यामुळे काही दुकाने तात्पुरती बंद करण्यात आली. दुचाकीस्वार आणि पादचाऱ्यांना याचा सर्वाधिक फटका बसला, अनेक ठिकाणी लोक घसरले किंवा पाण्यात अडकले.

फातोर्डा येथील केटीसी बसस्थानक परिसरात नाल्यांमध्ये कचरा अडकून राहिल्यामुळे पाणी साचल्याचे निदर्शनास आले. याशिवाय नावेली आणि मोड्डी परिसरातील रस्त्यांवरही जलजमाव झाला. सासष्टी तालुक्यातील नावेली, बाणावली आणि वार्का यांसारख्या भागांतही पावसामुळे पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली. अनेक अंतर्गत रस्ते आणि शेती क्षेत्र पाण्याखाली गेले.

दरवर्षी हीच पुनरावृत्ती होते. शहरात पूर आल्यावरच प्रशासनाला नाले सफाईची आठवण होते. मग उन्हाळा भर त्यांनी काय केलं? असा सवाल नावेलीमधील रहिवासी रॉडनी फर्नांडिस यांनी उपस्थित केला. महानगरपालिकेचे कर्मचारी दुपारनंतर जलजमाव दूर करण्यासाठी कार्यरत होते. मात्र नागरिकांनी दीर्घकालीन उपाययोजनांवर भर देण्याची मागणी केली आहे. जलनिकासी प्रणालीचा शाश्वत आणि कार्यक्षम पुनर्विचार करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. दरम्यान, भारतीय हवामान विभागाने आगामी काही दिवसांत अधिक पावसाचा इशारा दिला आहे. त्यामुळे तातडीने योग्य उपाययोजना न केल्यास परिस्थिती आणखी गंभीर होण्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

# हरमलात पावसाचा कहर

■ टीम दैनिक हेराल्ड

▸ मान्सून पूर्व कामे निष्क्रिय

▸ नागरिकांतून संताप

**हरमल, दि. २०** : येथील पंचायत क्षेत्रात काल सकाळी धुवांधार पावसाने कहर केला व सगळीच चोहो बाजूंनी पाणीच पाणी झाल्याने वाहन चालक व नागरिकांनी संताप व्यक्त केला.

दरम्यान, पावसाळा अद्याप सुरू नसला तरी कालच्या दिवसात पावसाने हाहाकार उडाला असून,ह्या मार्गात कोठे नेमके काय करायचे ह्याचा अंदाज आल्याचे नागरिकांनी व्यक्त केले.

कित्येक वर्षे पेट्रोल पंप रोड व सार्वजनिक सभागृह पर्यंत तसेच बँक ऑफ इंडिया पासून तिठा पर्यंतचा रस्त्याला ओहोलाचे स्वरूप आले होते.पूर्ण परिसर जलमय झाला होता.वास्तविक गेल्या वर्षी या भागात गटार सुविधा केली होती. मात्र गटार सुविधा निष्क्रिय ठरल्याचे नागरिक कृष्णा पालयेकर यांनी सांगितले.

दरम्यान, या पूर्ण रस्त्याची उंची वाढविणे काळाची गरज असून, तशी मागणी ग्रामस्थांनी पंचायत ग्रामसभेत अनेकदा केली आहे. मांद्रे मतदारसंघाचे आमदार जीत आरोलकर यांच्या कानी सदरहू गोष्ट घातली होती व गेल्या वर्षी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिकाऱ्यांना पाचारण करुन कामाची आखणी केली होती. सुदैवाने या पावसाळ्यात रस्त्याचे काम होऊ शकले नाही, त्यामुळे सदरचा प्रस्ताव तयार असूनही मार्गी लागला नसल्याने ग्रामस्थानी खंत व्यक्त केली. पूर्ण मार्ग पाण्याखाली गेल्याने वाहन चालकांना वाहने हाकणे कठीण झाले होते.ह्या खोलगट रस्त्याची दुरुस्ती करणे आवश्यक असून,आमदार जीत आरोलकर यांनी प्रस्ताव मंजुर केला असल्याचे सरपंच अनुपमा मयेकर यानी सांगितले. तरी मांद्रेचे आमदार जीत आरोलकर यांनी पावसाळ्यानंतर रुंदीकरण व डांबरीकरण काम हाती घेऊन या मार्गाचा जलमय होणारा भाग व समस्या दूर करावी, अशी मागणी होत आहे.

# मडगाव नगरपरिषदेच्या कर विभागातील फायली भिजल्या

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २०** : मडगावमध्ये पावसाळ्याच्या पहिल्याच सरींनी मडगाव नगरपरिषदेच्या (एमएमसी) कर विभागात थोडेफार नुकसान घडवले असून, अनेक फायली पावसाच्या पाण्यामुळे भिजल्या आहेत. मात्र, नगरपरिषद अध्यक्ष दामोदर शिरोडकर यांनी यावर प्रतिक्रिया देताना नागरिकांनी चिंताग्रस्त होण्याचे काहीच कारण नसल्याचे स्पष्ट केले आहे.

या संदर्भात माहिती देताना शिरोडकर म्हणाले की, पावसामुळे सुमारे सात फायली प्रभावित झाल्या आहेत. मात्र, त्या सुकवल्या जात असून त्यावर कोणताही दीर्घकालीन परिणाम होणार नाही.

शिरोडकर यांनी कर विभागाच्या कार्यालयाच्या स्थितीकडे लक्ष वेधले असून, ही इमारत गेल्या काही काळापासून नुतनीकरणाच्या प्रतीक्षेत आहे. महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीचे नूतनीकरण आवश्यक बनले आहे. यासाठीचा प्रस्ताव आम्ही सरकारकडे पाठवला असून, त्याचा संपूर्ण खर्च सरकारच उचलेल, असे त्यांनी सांगितले.

कर विभागातील महत्वाच्या नोंदी सुरक्षित राहाव्यात यासाठी आवश्यक त्या सर्व खबरदारीचे उपाय करण्यात येत असल्याचेही शिरोडकर यांनी नमूद केले. दरम्यान, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या तयारीबाबत बोलताना शिरोडकर यांनी सांगितले की, पावसाळ्याशी संबंधित बहुतेक कामे पूर्ण



झाली आहेत. पावसात पूर परिस्थिती उद्भवू नये आणि पाणी साचू नये यासाठी एमएमसीकडून प्रभावी उपाययोजना केल्या जात आहेत.

गोवा हे मान्सून व्यवस्थापनाच्या दृष्टीने इतर राज्यांच्या तुलनेत अधिक सक्षम असल्याचा दावा करताना, शिरोडकर यांनी सांगितले की, पायाभूत सुविधांची सुरक्षितता आणि कार्यक्षमतेवर आमचा भर असून, संपूर्ण हंगामभर एमएमसी सज्ज आहे.

पावसामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेल्या चिंतेबाबत विचारता शिरोडकर म्हणाले, महानगरपालिकेचे संपूर्ण यंत्रणा सतर्क आहे. मान्सून दरम्यान उद्भवणाऱ्या कोणत्याही आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आम्ही पूर्णपणे तयार आहोत. इमारतीच्या नुतनीकरणाचे काम सुरू असतानाच कर विभागाच्या नियमित कामकाजात अडथळा येऊ नये आणि दस्तऐवज सुरक्षित राहावेत यासाठी सर्व आवश्यक उपाय केले जातील, असेही नगराध्यक्षांनी स्पष्ट केले.

